रविवार मुंबई सकाळ

ता. ५-५-९१

# शाहिरी परंपरा समृद्ध करणारे कवी भूषण



**शा**हीर म्हटला म्हणजे पोवाडे गाणारा कलावंत असा अर्थ मनात येतो पण त्याहीपलिकडे शाहीर या शब्दाला व्यापक अर्थ आहे. शाहीर म्हणजे स्वतः काव्य रचना करून ती स्वतःच गाणारा, इतरांना गाण्यास शिकवणारा कलावंत असा आहे. संगीतात 'नायक' या शब्दाला जो अर्थ आहे तो शाहीर या शब्दाला चपखल बसतो.

महाराष्ट्रात शाहिरी परंपरा फार जुनी आहे. शिवाजीच्या काळात जनजागृतीसाठी शाहिरांनी पोवाडे गाऊन लोकांत चैतन्य निर्माण केले. मरगळ घालविली आणि शिवकार्यासाठी त्यांना उद्युक्त केले. पेशव्यांच्या काळात या कलेला बहर आला. अनेक शाहीर निर्माण झाले. त्यांनी अनेक पोवाडे रचले, गायिले. पुढील ब्रिटीश राज्यात या शहरांकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे त्यांनी रचलेल्या पोवाड्यापैकी काही काळाच्या विस्मृतीत गेले तर पाठांतर नसल्याने किंवा लिहून न ठेविल्याने ते लोपही पावले. तरीदेखील आज काही शाहिरांकडे परंपरेने चालत आलेले पोवाडे शिल्लक आहेत.

लोकमान्य टिळक, सावरकर आदी देशभक्तांनी पोवाड्याचे व शाहिरांचे महत्त्व ओळखले होते. त्यांनी सुशिक्षित लोकांना शाहिरीचे आवाहन केले. व

**संत, पंत आणि तंत यांनी मराठी काव्य परंपरा समृद्ध केली. तंत म्हणजे शाहीर. शाहिरी परंपरेने कवितेद्वारे एक आवेशपूर्ण, जाज्वल्य चैतन्य निर्माण करण्याचं महत्त्वाचं कार्य केलं. या परंपरेतील एक महत्त्वाचे शाहीर प्रल्हादराय जामखेडकर ऊर्फ शाहीर कवी भूषण.**

**कवी भूषणांची जन्मशताब्दी उद्यापासून सुरू होत आहे. त्या निमित्ताने त्यांचा परिचय देणारा हा लेख.**

राष्ट्रभक्तीकडे जनतेस वळविण्यास उद्युक्त केले. या प्रयत्नातून खाडिलकर, [illegible], मुवाटे, दीक्षित, मुळे, जामखेडकर, एकदोन असे शाहीर निर्माण झाले. त्यांच्या काळात शाहिरांचा एक अलिखित नियमच होता की प्रत्येक गणेशोत्सवात प्रत्येकाने नवा पोवाडा रचून सादर करावयाचा. प्रतिभावान असे मोजके शाहीर असा प्रयत्न करीत आणि ते सहजिक प्रस्थापित कलाकार म्हणून नावारूपाला आले. त्यांच्या नावाचा एक दबदबा त्यांनी निर्माण केला. या शाहिरांनी परंपरागत चालीबरोबर प्रसंगानुरूप नव्या चाली लावून पोवाडे गायिले. त्यामुळे पोवाडे गायन देखील श्रवणीय झाले. या गायन कलेलाही स्वतःचे असे स्थान या शाहिरांनी मिळवून दिले.

अशाच एका कलाकाराची-प्रतिभावान शाहिराची जन्मशताब्दी ६ मेला शाहिरी जग साजरी करीत आहे. आजच्या पिढीला शाहिरी आणि गायन याचे तेवढेसे आकर्षण राहिले नाही. खाडिलकरानंतर पोवाडे रचनाकारांची परंपरा खंडित झाली आहे. जन्मशताब्दी साजरी होत असलेल्या कलावंतांचे नाव आहे शाहीर प्रल्हादराव जामखेडकर. त्यांचे चरित्र आजच्या पिढीला बरेच काही सांगून जाईल.

बरोबर १०० वर्षांपूर्वी ६ मे १९८९ रोजी एका ब्राह्मण कुटुंबात नाशिक येथे प्रल्हादरायांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रंगनाथ असे होते. प्रल्हादरायांचे शालेय शिक्षण नाशिकातच झाले. शाळेत शिकत असताना ऐतिहासिक वाङ्मयाकडे आकृष्ट झाले. त्या आवडीतून त्यांना पोवाडे रचण्याची प्रेरणा मिळाली. शालेय शिक्षणाने मराठी आणि इंग्रजी भाषा त्यांनी उत्तमरीतीने अवगत करून घेतल्या. मराठी कविता-संस्कृत श्लोक यांच्या पाठांतराने त्यांची वाणी स्वच्छ आणि टोकदार झाली. याचा उपयोग त्यांना शाहिरी कवने गाताना झाला. शालेय शिक्षण पुरे झाल्यावर त्याकाळच्या कुठेतरी सरकारी नोकरीत चिकटण्याच्या रूढीप्रमाणे त्यांनी पीडब्ल्यूडी म्हणजे आजच्या सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी धरली. तरी त्यांचे नोकरीत मन रमत नसे. पोवाडे रचावेत, गावेत अशा धुंदीत ते नेहमी असत. परिणामी त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. आणि १९२० साली डफावर पहिली थाप मारून शाहिरी पेशात पदार्पण केले. त्यांचे शाहिरी पोवाडे गायन लोकांना आवडू लागले. त्यामुळे उत्साहित होऊन त्यांनी आपला स्वतःचा सुसज्ज असा उत्कृष्ट संच (फड) उभा केला. या आपल्या शाहिरी संचात ते आपण स्वतः रचलेले पोवाडे नव्या चालीत नटवून म्हणू लागले. कणखर, दमदार आणी खड्या आवाजात गायिलेल्या या पोवाड्यांनी श्रोत्यांना आकर्षित करून ठेविले. [illegible] नावलौकिक मिळालेले त्यावेळचे प्रसिद्ध शाहीर दुर्गाप्रसाद तिवारी जामखेडकरांचे पोवाडे ऐकून भारून गेले. ब्राह्मण शाहिराचे त्यांना एक अप्रुप वाटले. त्यांनी जामखेडकरांना खूप उत्तेजन दिले. अनेक प्रकारे सहाय्य केले. त्यामुळे प्रल्हादरायांचा उत्साह वाढतच गेला. त्यांच्या शाहिरी फडाचा पसारा वेगाने वाढतच गेला. सरकारी नोकरी अचानकपणे सोडण्याचे साहस केले म्हणून त्यांच्यावर नाराज असणारे लोक आता प्रल्हादरायांचे कौतुक करू लागले.

### विपुल रचना

प्रल्हादरायांनी अनेक पोवाडे रचले व गाऊन लोकप्रिय केले. वीरान्त [illegible] प्रतापी प्रताप सिंह, सिंहगडच्या समरांत, शरास-सव्वाशेर म्हणजेच अफझलखां वध, संग्राम देवता राणी लक्ष्मीबाई व लक्ष्मीबाई पुण्यस्मरण, जवानमर्द बापू गोखले, बाजीप्रभू देशपांडे, बदामीचा वेढा हे ऐतिहासिक विषयावरील पोवाडे त्याकाळी लोकप्रिय झाले होते. प्रल्हादरायांना काळाचे भान सतत असे. केवळ ऐतिहासिक घटनात ते रमून जात नसत. तर आधुनिक काळातील राजकारणाचे विषय त्यांनी हाताळले. स्वातंत्र्यवीर सावरकर, उन्नती की अवनती, राष्ट्रपिता महात्मा गांधी सुधारणा व देशस्थिती अशा पोवाड्याबरोबर काही लावण्या, शाहिरी ढंगाची कवने, असावा-नसावा. (यस और नो) या स्वरूपाची चटकदार कवने त्यांनी रचली व ती शाहिरी पुष्पमालेतून प्रसिद्ध केली.

### शाहिरी डफ-नमन

पोवाडा गाण्याची सुरुवात त्यांनी 'शाहिरी डफ नमन' या कवनाने करण्याची प्रथा पाडली. या नमनात ते देवादिकांना नमन तर करीतच पण त्याबरोबर साधुसंतांना, रथी महारथी पूर्वज शूरांना, बुद्धीमंतांना, मुत्सद्यांना, विसरत नसत. तसेच आधुनिक राजकरण्यानाही पण त्यांचा प्रणाम असे. आणि शेवटी पूर्वज थोर मान्यवर शाहिरांना ते विसरत नाहीत. कवनात ते म्हणतात –

**अनंत फंदी राम जोशी होनाजींनी।**
**कित्येक शाहीर हाती डफ घेऊनी।**
**चैतन्य दिले हो त्यांनी स्वराज्यातुनी।**
**गजवायला अवघा महाराष्ट्र शूर मर्दानी।**
**महाराष्ट्र देवता प्रसन्न झाली क्षणी।**
**मर्दवीर लोपता पारतंत्र्य ये क्षणी।**

काव्य रचना करताना भाषेतील अलंकारांचा ते मुक्त उपयोग करीत. अनुप्रास अलंकारांचा उपयोग केलेला बाजी प्रभूचा पोवाडा अशाप्रकारचा आहे. पहाता ?

**फाजलखान सिद्दी जोहार। शहांचा हार, रणावरी खाईना जो हार। विजयश्री घाली सदोदित हार। पण शिवापुढे त्याने खास्सी हार। हार खाऊन झाला परिहार। अल्लापासन हार। दिस्तीत काऽऽऽहार ।।धृ।। यातील हार शब्दाचा अनुप्रास आणि अर्थ काकू यमक या अलंकाराचा त्यांनी केलेला सुयोग्य वापर वाचकांनी तपासावा.**

### सामाजिक विषय

जामखेडकरांनी सामाजिक विषयही आपल्या शाहिरी कवनांत घेतले आहेत. १९३१ साली त्यांनी लिहिलेल्या "सुधारणा" या कवनात त्यावेळेच्या परिस्थितीचे वर्णन करताना त्यावेळी कसा अनाचार सर्वत्र माजला आहे-समाजाचा कसा अधःपात होत आहे हे दाखवताना स्नान संध्या न करणारा ब्राह्मण, स्वहस्ते दाढी करणारे तरुण, वडील जिवंत असताना मिशा काढणारी तरुण पिढी, मर्दपणा विसरत चाललेले क्षत्रिय, दूध-तूप खाण्याचे सोडून चहाच्या आहारी गेलेला व निर्बल झालेला समाज, स्त्री सुलभ लज्जा व विनय हे कमी होत जाणाऱ्या कुलीन स्त्रिया, देशभक्तांच्या नावावर फंडगुंडगिरी करणारे तथाकथित देशभक्त, पुढारीवर्ग या सर्वांवर त्यांनी कोरडे ओढले आहेत.

आज परिस्थिती बदलल्याने जामखेडकरांना त्यांच्या तरुणपणी निषेधार्ह वाटणाऱ्या गोष्टी आज परिचयाच्या होत आहेत. काही झाल्याही आहेत. त्यामुळे ही कवने आज कालबाह्य ठरतील. पण त्यावेळी लोकांना ती रूचली.

### मानसन्मान

१९४५ साली जगन्नाथपुरीचे जगद्‌गुरु श्रीमान शंकराचार्य यानी जामखेडकरांना 'कवी भूषण' ही पदवी देऊन जामखेडकरांचा गौरव केला. त्याचप्रमाणे साहित्यसम्राट न. चि. केळकर, शाहीर खाडीलकर, य. न. केळकर, संत कवि दासगणू, गोविंद गोपाळ देसाई, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, तसेच 'प्रागतिक'चे संपादक द. वा. जोशी इत्यादी थोर व्यक्तींचे त्याना आशीर्वाद लाभले. त्यांच्याकडून प्रोत्साहन मिळाले. केसरी, लोकसत्ता, महाराष्ट्र (नागपूर) चित्रमय जगत्-प्रागतिक, प्रबोध इत्यादी नियत कालिकांनी जामखेडकरांच्या पोवाड्यांची स्तुती केलेले लेख प्रसिद्ध करून जनतेला त्यांच्या कार्याची ओळख करून दिली.

यंग इंडिया ग्रामोफोन कंपनीने त्यांच्या "रेशनिंग" या विषयावरील दोन ध्वनि-मुद्रिका काढल्या होत्या. त्या त्याकाळी अत्यंत लोकप्रिय झाल्या होत्या.

जामखेडकरांच्या शाहिरी पोवाड्यात अस्सल शाहिरी ढंग आढळतो. काही शाहिरांच्या काव्यातील पांडित्य पोवाड्याच्या आकृतीबंधाला मारक ठरतो. जामखेडकरांनी साहित्य पांडित्याचा मोह टाळल्यामुळे त्यांचे सर्व पोवाडे जुन्या अस्सल बाजाचे वाटतात. केसरीत १९३४ साली प्रसिद्ध झालेल्या 'शाहिरी वाङमय खुरटून देऊ नका' या लेखात-शाहिरी वाङमयाच्या संबंधात तख्खातील शाहिरांच्या रचनांचा आढावा, आणि गुणदोष दाखविताना "...खानदेशातील शाहीर प्रल्हादराय जामखेडकर यांचे पोवाडे अलंकारपूर्ण (भाषेचे) असूनही 'सुबोध' आहेत", असा गौरवपूर्ण उल्लेख आहे.

### आवेशपूर्ण शैली

ज्या विषयावर पोवाडा रचावयाचा त्या विषयाची संपूर्ण, सर्वांगीण माहिती मिळवून मग त्यावर पोवाडे रचण्यावर त्यांचा कटाक्ष असे. म्हणूनच त्यांच्या पोवाड्यांची ऐतिहासिक माहिती सत्याला धरून अशी असते. बाजी प्रभूच्या पोवाड्यात वीररसाला उधाण आले. त्यातील आवेश वाखाणण्याजोगा आहे तो ऐकताना श्रोत्यांना स्फुरण चढत असे.

झाशीच्या राणीवरील पोवाडाही त्यांनी अंत्यांतिक आत्मीयतेने लिहिला आहे. झाशीच्या राणीची शोकांतिका वाचताना, ऐकताना रसिकांचे डोळे पाणावतात. त्यातील भाषेचा आवेग श्रोत्यांना खिळवून ठेवत असे. स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील पोवाड्यात सावरकरांच्या वेळचे राजकीय आणि सामाजिक चळवळीचे सम्यक दर्शन घडते. जामखेडकरांचे अनेक पोवाडे छापून प्रसिद्ध झाले असले तरी आणखी बरेच अप्रसिद्ध आहेत. ते शोधून प्रसिद्ध व्हावयास हवेत. त्यांच्या जन्मशताब्दी-निमित्त संकल्प कुणी पोवाडे प्रेमीने सोडला पाहिजे.

तसे पाहिले तर शाहिरांना आर्थिक प्राप्ती बेताचीच होई. अगदी पोटापुरते धन मिळे. पण पोवाड्याच्या अत्यंत अंतरिक ओढीमुळे व निष्ठेने त्यानी पोटाला चिमटा घेऊन ही कला जगवली. यात शंका नाही. महाराष्ट्र सरकारने संगीत-लोकसंगीत आदी कलाकारांना काहीसे मानधन-निवृत्ती वेतन सुरू केले. पण पोवाडे गाणारे शाहीर मात्र त्यापासून वंचितच राहिले. सरकार विचारत नाही व जनता बूज ठेवीत नाहीत म्हणून शाहिरी परंपरा तुटत चालली आहे.

शिवाजी महाराजांच्या काळी शाहीर अज्ञान दासाने अफझलखान वधाचा पोवाडा रचून गाईल्याबद्दल त्याला शेरभर सोन्याचा तोडा व एक घोडा बक्षीस मिळाला होता. आता तो काळ राहिला नाही. जामखेडकर यांनीही अफझलखान वधाचा उत्कृष्ट पोवाडा रचला. असा तोडा आता कोण देणार ? ही खंत त्यांनी आपल्या पोवाड्यातून व्यक्त केली आहे. ते पहा.

**शाहीराने करता पोवाडा ।**
**सोन्याचा तोडा । आणि एक घोडा ।**
**रायाने बक्षीस दिधला त्यास ।**
**धन्य दाता शिवाजी झाला**
**आज कोण हो बोला । देतो हो मला ।**
**अशा बक्षीसास । जी जी जी ॥**
**दारिद्र्यात पंख रुतले । हाल हाल झाले ।**
**बेकार वाढले ।**
**कोण देणार आज तोडा ? ।**
**फार झाले तर हातपायाला।**
**घाला आता खोडा ।**
**पुण्य हे जोडा । जी जी जी ॥**

शाहिरी पोवाडे वाङमय हा मराठी संस्कृतीचा एक अनमोल ठेवा आहे. तो जतन केला पाहिजे. सर्वांचे ते एक कर्तव्य आहे. लोककला शिक्षणाच्या अभ्यासात या विषयाचाही अंतर्भाव व्हावयास हवा. त्यांच्या शिक्षणाची सोयही व्हावयास पाहिजे. संगीतविषयक शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या अभ्यास क्रमांतही या विषयाचा अंतर्भाव व्हावयास हवा. संगीताची पदवी घेणाऱ्याला निदान एकतरी पोवाडा गाता यावयास हवाच !

आज अनेक शाहीर पोवाडे गाऊन परंपरा जतन करीत आहेत. त्यांच्याकडे काही पोवाडे अलिखीतही असतील, तेव्हा त्यांच्याकडे सर्व पोवाड्यांचे ध्वनिमुद्रण करून ठेवायला हवे. त्यातून मग पुनरुक्तीही दिसण्याची शक्यता आहे. या सर्वांचे संकलन करून सर्व अधिकृत अशा पोवाड्यांचा संग्रह तयार करण्याचे कार्य जामखेडकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त हाती घ्यावयास हवे.

सुदैवाने प्रल्हादरायांचे सुपुत्र डॉ. प्रभाकर यांच्याकडे त्यांचा वारसा चालून आला आहे. ते स्वतः उत्तमरीतीने पोवाडे गातात. अशा सुशिक्षित व्यक्तीकडे या कार्याचे नेतृत्व दिल्यास पोवाड्यांच्या संकलनाच्या कामाला वेग येईल.

शाहीरा-शाहिरांत आपापल्या परंपरेचा काही 'ईगो' असतो. पण तो त्यांनी अशा महत्त्वाच्या आणि एका ऐतहासिक कार्यासाठी भावी पिढीला कलेचा वारसा पोचविण्यासाठी म्हणून सोडून एकदिलाने एकत्र येऊन पोवाड्यांच्या संकलनास पुढे यावे.

शाहीर प्रल्हादरायांना तीच खरी श्रद्धांजली ठरेल.

**डॉ. वसंतराव राजोपाध्ये**